# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

# बी. डी. कॉलेजच्या संगणक प्रयोगशाळा व विस्तारित इमारतीचे आज उद्घाटन

▲पाटण, दि. ८ : येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बी. डी. कॉलेज, पाटण येथे विविध नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. या अनुषंगाने उभारण्यात आलेल्या नवीन अद्ययावत संगणक प्रयोगशाळा आणि विस्तारित इमारतीचा उद्घाटन समारंभ गुरुवार, दि. ९ रोजी दुपारी २.३० वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आ. अतुल भोसले, पाटण विधानसभा मतदारसंघाचे नेते सत्यजितसिंह पाटणकर व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार असल्याची माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी दिली.

या नवीन अभ्यासक्रमांमध्ये बी. कॉम. आय. टी., बी. सी. ए., बी. एस्सी. (कॉम्प्युटर सायन्स - इंटायर), एम. कॉम. आय. टी., एम. के. सी. एल. तसेच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र यांचा समावेश असून यामार्फत विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, संगणक साक्षरता तसेच व्यावसायिक कौशल्य आत्मसात करता येणार आहे.

या कार्यक्रमास कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण तसेच मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. उद्घाटन सोहळ्यास परिसरातील तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांसह नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार यांनी केले आहे.